वाचले -

१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६

२) मा. आयुक्त यांचेकडील क्र. अग्नि/४/कावि/६०१/२०२१ दि. २६/१०/२०२१ चा आदेश.

३) मा. विधी समिती मंजूर सभा ठराव क्र. ३ दि. १४/६/२०२२

४) मा. महापालिका सभा मंजूर ठराव क्र. ८६ दि. २३/६/२०२२

५) मा. आयुक्त यांचे कडील दि. ०५ /०७/२०२२ चा मान्य प्रस्ताव

*******************************************************************************************************

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८, अग्निशामक विभाग
क्र. अग्नि/४/ कावि/ २७२ /२०२२
दि. ०५ /०७/२०२२

विषय : मनपा क्षेत्रातील अनाधिकृत भंगार व्यावसायिक, गोडावून चे अग्निशमन व पाणी फवारणी यांचे कामकाजाकरीता सुधारीत अग्निशमन सेवा शुल्क दर आकारणी करणे बाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अग्निशामक विभागाकडुन नागरीकांचे जिवित व वित्तहानी वाचविण्याचे मुख्य कामकाजा बरोबरच शहरामधील विविध प्रकारचे उंच निवासी, बिगरी निवासी, वाणिज्य, मिश्र बांधकामांकरीता तसेच व्यवसायाकरीता अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड विकास नियंत्रण नियमावली, महाराष्ट्र आग प्रतिबंध व जिवित सुरक्षितता अधिनियम २००६, नॅशनल बिल्डींग कोड नूसार तात्पुरता, सुधारीत, अंतिम (पक्का), नुतनिकरण अग्निशामक ना हरकत दाखला हा अग्निशमन सेवा शुल्क आकारुन दिला जातो. अग्निशामक ना हरकत दाखला व अग्निशमन सेवांकरीता आकारणेत येणारे अग्निशमन सेवा शुल्काचे दर हे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसुरक्षितता अधिनियम २००६ चे कलम १२(१) नूसार वाचले क्र. २ अन्वये अग्निशमन सेवा शुल्काचे दर निश्चित करून आकारणी करणेत येत आहे.

तथापि, मनपा क्षेत्रामध्ये चिखली, कुदळवाडी, थेरगाव इत्यादी भागांमध्ये मोठ्या प्रमाणात स्क्रॅप, भंगार, व्यवसायिक, गोडावून्स मोठ्या प्रमाणात आहेत. सदरचे गोडावून हे संपुर्ण कच्चा किंवा पक्का मालाने भरलेले असतात त्यामुळे प्रचंड मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर होतो. तरी, मनपा हद्दीमधील अनाधिकृत स्क्रॅप व्यवसाय, गोडावून इ. व्यवसाय धारक, मालक किंवा भोगवटादार यांचेकडून मिळकत अनाधिकृत असल्यास त्या बाबत विभागने खातरजमा करून आग विझविणेकामी खालील प्रमाणे नव्याने शुल्क आकारणी करणेत यावी.

| १ | मनपा हद्दीमधील अनाधिकृत भंगार व्यवसायिक, गोडावून अग्निशमन व विमोचन वर्दी | शुल्क (अग्निशमन व बचाव वाहन) |
|---|---|---|
| ब | बिगर निवासी आग / विमोचन | र.रु ३०००/- प्रति वाहन / प्रती ट्रीप |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका, कार्यक्षेत्रामध्ये ब-याच वेळेस सामाजिक संस्था, सन्मा. पदाधिकारी इत्यांदीकडून मैदाने, मंदीर इत्यादी ठिकाणी सामाजिक कार्यक्रमांकरीता अग्निशमन वाहनांच्या साह्याने, पाणी फवारणीचे मागणी करणेत येते. विभागाकडून पाणी फवारणी बाबत वाचले क्र. २ अन्वये शुल्क आकारणेत येते. पंरतू सदरचे शुल्क हे त्या पुर्वीचे र.रु १०००/- चे तुलनेत अधिक होत असल्याने, अनेक नागरीक शुल्क भरणेस टाळाटाळ करतात. सदरची बाब लक्षात घेता, सध्याचे पाणी फवारणी शुल्क खालील प्रमाणे सुधारीत शुल्कान्वये आकारणी करणेत यावी.

| १ | पाणी फवारणी / पंपींग चार्ज - | मंजूर दर (प्रति वाहन / प्रती ट्रीप) | सुधारीत दर (प्रति वाहन/ प्रती ट्रीप) |
|---|---|---|---|
| अ | मनपा हद्दिमध्ये | र.रु ५,०००/- | र.रु ३,०००/- |
| ब | मनपा हद्दिबाहेर ( १०कि.मी. पर्यंत) | र.रु १०,०००/- | र.रु ६,०००/- |

उक्त प्रमाणे सुधारीत व नविन अग्निशमन सेवा शुल्क आकरणी करणे बाबत, मा. विधी समिती व मा. महापालिका सभा यांची वाचले क्र. ३ व ४ अन्वये, मंजूरी आहे.

सबब, मी. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी – १८ मला प्राप्त अधिकारानूसार मनपा हद्दीमधील अनाधिकृत भंगार व्यवसायिक, गोडावूनचे अग्निशमन व विमोचन वर्दीकरीता तसेच पाणी फवारणी करीता सदर आदेशाचे दिनांकापासून नव्याने सुधारीत अग्निशमन सेवा शुल्क आकरणी लागू करणेस मान्यता देत आहे.

०५/०७/२२

आयुक्त तथा प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रत –

अग्निशामक विभाग

........... उक्त प्रमाणे आदेशाचे दिनांकापासून अंमलबजावणी करणेत यावी.